**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. महंमद बाबालाल मुल्ला
३८,लक्ष्मीनगर, एम.आय.डी. सी. सातारा **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सदस्य सचीव** तथा संचालक (विजभज)
संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,**
राज्य मागासवर्ग आयोग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १००/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.०१.२००९ |
| ३ | उपस्थित<br>अपीलकर्ता<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** | श्री. महंमद बाबालाल मुल्ला<br>३८, लक्ष्मीनगर, एम. आय.डी.सी. सातारा<br>सदस्य सचीव तथा संचालक, (विजभज),<br>श्री . एल.एस.माळी<br>संशोधन अधिकारी, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे<br>श्री. ई. एस. गायकवाड |
| ४ | जन माहिती अधिकऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२८.०३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकऱ्याकडे उत्तर दिल्याची तारीख | दि.०९.०४.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.५.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य मागासवर्ग आयोगाच्या अहवालाची प्रत व अनुषंगिक माहिती आपल्याला जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांनी दिली नाही. राज्य माहिती आयोगाकडे अपील

दाखल केल्यानंतर शुल्क भरण्याबाबत कळविले. हे लक्षात घेता माहिती नि:शुल्क मिळावी व जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती लावावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. मंहमद बाबालाल मुल्ला यांनी केली.

श्री. मुल्ला यांनी मागितलेली माहिती सुमार ७०० पृष्ठांची आहे. छायाप्रतींचा खर्च भरून ही माहिती घ्यावी, असे श्री. मुल्ला यांना दि. ०९.०३.२००७,दि. ०९.०४.२००७ दि.१७.०५.२००७ अशा तीन पत्रांन्वये कळविले होते. राज्य माहिती आयोगाला दि.११.०९.२००८ च्या पत्रान्वये या पत्राच्या प्रतीसह त्याबाबतचा अहवाल सादर केला होता व त्याची प्रतही श्री.मुल्ला यांना पाठविली होती. असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे श्री. इ.एस. गायकवाड यांनी केले. शुल्क भरल्यावर त्वरित माहिती देण्यात येईल, अपिलीय प्राधिकारी तथा सदस्य सचिव राज्य मागासवर्ग आयोग, पुणे श्री . एल.एस.माळी यांनी सांगितले. हे लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. तथापि श्री. मुल्ला यांनी पाठविलेल्या पत्रांची प्रत सादर करता न आल्यास जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे श्री. ई. एस. गायकवाड यांनी खुलासा करावा व श्री. मुल्ला यांना माहिती नि:शुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे

२)आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. ही बाब गंभीर आहे. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,राज्य मागासवर्ग आयोग यांनी दि. ३१.०३.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा, अन्यथा ते पुढील कारवाईस पात्र राहतील.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 26 FEB 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.नरेंद्र राघवेंद्र सुमंत
१०९७ ,अ, शनिवार पेठ,
सातारा **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कृष्णानगर,
सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उप कार्यकारी अभिंयता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कृष्णानगर,
शहर उपविभाग,प्रतापगंज पेठ, सातारा,

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०१४/२००९/ सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.२.२०१० |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नरेंद्र राघेवंद्र सुमंत
१०९७ ,अ, शनिवार पेठ, सातारा

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
विभागीय कार्यालय, कृष्णानगर, सातारा
श्री.एस.के.पाटील

**जन माहिती अधिकारी तथा** उप कार्यकारी अभिंयता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
विभागीय कार्यालय, कृष्णानगर,
शहर उपविभाग,प्रतापगंज पेठ, सातारा,
श्री. रविंद्र शि.आव्हाड

| | | |
|---|---|---|
| ४ | जनमाहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक १५.२.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक १६.४.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक २२.५.२००९ |
| ७ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :- मूळ माहिती-मागणी अर्ज (जोडपत्र-अ ) ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.नरेंद्र राघवेंद्र सुमंत यांनी श्री.अमृत जि.सुमंत यांच्या जानेवारी २००३ ते डिसेंबर २००४ या कालावधीतील विद्युत बिलाबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सातारा यांच्याकडे मागितली, सदर माहिती चुकीची मिळाल्याच्या कारणावरून व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सातारा यांनी दिलेल्या निर्णयाविरूध्द श्री.सुमंत यांना राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. या अपिलाची सुनावणी दि.६.२.२०१० रोजी घेण्यात आली. आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याचे निवेदन सुनावणी दिवशी दि.६.२.२०१० रोजी अपीलकर्ता श्री.सुमंत यांनी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 18 FEB 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.भरत सूर्यकांत राऊत
४३अ, मल्हारपेठ, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
सातारा नगरपरिषद, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगररचनाकार,
सातारा नगरपरिषद, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०१८ / सातारा /२००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.भरत सूर्यकांत राऊत
४३अ, मल्हारपेठ, सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा नगररचनाकार, सातारा नगरपरिषद, सातारा श्री.स.स.मुगडे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.२.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१७.३.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१६.४.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१४.५.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सातारा येथील एका जागेच्या मोजमापाच्या संदर्भातील आदेशाची प्रत, भाग निरीक्षकांबरोबर असलेल्या व्यक्तीची नावे इ. माहिती जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार, सातारा नगरपरिषद, सातारा यांनी दिली नाही. ही माहिती जाणीवपूर्वक नाकारण्यात येत आहे. भाग निरीक्षक श्री.गोविंद मोहिते यांच्याकडून त्यांच्या बरोबरच्या व्यक्तींची नावे व पत्ते घेऊन देणे शक्य असताना दिले नाहीत. अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा यांनी आपल्या तक्रारीची दखल न घेता अपील फेटाळले, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.भरत सूर्यकांत राऊत यांनी केले.

तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जागेवरील मोजमापे घेण्यासाठी भाग निरीक्षक गेले होते. त्यासाठी मुख्याध्यापकांनी तोंडी सूचना दिल्या होत्या. तसेच तक्रारीबाबत चौकशी करण्याचे आदेश तोंडी दिले होते. तसेच श्री.मोहिते एकटेच चौकशीसाठी गेले होते, त्यामुळे बरोबरच्या व्यक्तींची नावे देण्याचा प्रश्न येत नाही, ही माहिती देण्यात आली असली तरी 'खुलासा अथवा प्रश्नोत्तर स्वरूपात माहिती देणे अपेक्षित नसल्याचे' काही मुद्दयांमध्ये नमूद केले आहे. परंतु या मुद्दयांबाबत खुलासा अथवा स्पष्टीकरण अपेक्षित नसून वस्तुस्थितीची नेमकी माहिती नमूद करणे आवश्यक आहे. तसे पत्र अपीलकर्त्यास दोन दिवसांत द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.२१.११.२००९ रोजी मुद्देनिहाय उत्तर दिल्याचे जन माहिती अधिकारी तथा

नगररचनाकार, सातारा नगरपरिषद, सातारा श्री.स.स.मुगडे यांनी उत्तराच्या प्रतीसह आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.२६.२.२०१०

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महंमद बाबालाल मुल्ला
लक्ष्मीनगर, एम.आय.डी.सी., सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता (बांधकाम विभाग),
सातारा नगरपरिषद, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२० / सातारा /२००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००९ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता (बांधकाम विभाग),
सातारा नगरपरिषद, सातारा प्रतिनिधी श्री.पी.बी.साबळे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.३.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.८.४.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३०.४.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१४.५.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या मूळ अर्जानुसार मुद्दा क्र.४ ची माहिती अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतरही जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता (बांधकाम विभाग), सातारा नगरपरिषद, सातारा यांनी दिली नसल्याच्या कारणावरून अपीलकर्ता श्री.महंमद बाबालाल मुल्ला यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.मुल्ला यांचा अर्ज दि.२४.७.२००९ चा असून बिल रजिस्टरच्या अवलोकनासाठी दि.१८.८.२००९ रोजी त्यांना बोलाविले होते. अभिलेख अवलोकन करून त्यांनी मागणी केलेल्या प्रती त्यांना त्याच वेळी दिल्या. यापूर्वीही ही सर्व माहिती त्यांना देण्यात आली होती व त्यांनी मागितलेली सर्व माहिती पुन्हाही दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता (बांधकाम विभाग), सातारा नगरपरिषद, सातारा यांचे प्रतिनिधी श्री.पी.बी.साबळे यांनी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २६.२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजीराव भाऊसाहेब बर्गे
बुरूडगल्ली, मु.पो.ता.कोरेगाव, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, दि मॉडर्न एज्युकेशन सोसायटी,
द्वारा-सरस्वती विद्यालय, कोरेगाव, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा दि मॉडर्न एज्युकेशन सोसायटी,
द्वारा-सरस्वती विद्यालय, कोरेगाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२३ / सातारा / २००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवाजीराव भाऊसाहेब बर्गे
बुरूडगल्ली, मु.पो.ता.कोरेगाव, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, दि मॉडर्न एज्युकेशन सोसायटी,
द्वारा-सरस्वती विद्यालय, कोरेगाव, जि.सातारा श्री.विलास ज्ञानेश्वर काळे

**जन माहिती अधिकारी** तथा दि मॉडर्न एज्युकेशन सोसायटी,
द्वारा-सरस्वती विद्यालय, कोरेगाव, जि.सातारा श्री.चंद्रकांत काशिनाथ वीरकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३.६.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१३.७.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती सहीशिक्क्यासह जन माहिती अधिकारी तथा दि मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, द्वारा-सरस्वती विद्यालय, कोरेगाव, जि.सातारा यांनी दिली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.शिवाजीराव भाऊसाहेब बर्गे यांनी केली.

अपीलकर्त्याची कन्या श्रीमती प्रतिभा शिवाजीराव बर्गे यांनी संस्थेविरूध्द उच्च न्यायालयात केलेले पाच दावे, शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर व जिल्हा न्यायाधीश, सातारा यांच्याकडील दावे या न्यायालयीन प्रकरणामध्ये संबंधित कागदपत्रे सुपूर्त केलेली होती. दरम्यानच्या काळात दाव्यातील संस्थेचे एक वकील व संस्थेचे मानद सचिव यांचे निधन झाले. मुंबई उच्च न्यायालयात रीटचे काम पाहणाऱ्या वकिलांकडून कागदपत्रे उपलब्ध करून घेऊन श्री.बर्गे यांना हस्तपोच व रजिस्टरने पाठविली. श्रीमती प्रतिभा बर्गे यांनीही तीच माहिती पूर्वी मागितली होती व ती त्यांना त्याच वेळी देण्यात आली होती, असे लेखी व तोंडी निवेदन दि मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, द्वारा-सरस्वती विद्यालय, कोरेगाव, जि.सातारा या संस्थेचे सचिव श्री.विलास ज्ञानेश्वर काळे यांनी केले. अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असून आवश्यक तेथे प्रमाणित करून द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२६.२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मोहन बाबुराव लोखंडे
स्वामी विवेकानंद, टेलिफोन ऑफिस समोर,
फलटण, ता.फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद सातारा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२८ / सातारा / २००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. मोहन बाबुराव लोखंडे
स्वामी विवेकानंद, टेलिफोन ऑफिस समोर,
फलटण, ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद सातारा, जि.सातारा श्री.एम.एम.पालकर

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद सातारा, जि.सातारा श्री.आर.ए.चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२.६.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२०.६.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१३.७.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.-- |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती देण्याऐवजी नस्त्यांमधील माहिती पाहून समक्ष निवड करण्याबाबतचे पत्र जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी(प्राथमिक), जिल्हा परिषद, सातारा यांनी दिले. परंतु मागितलेल्या माहितीचे शुल्क कळवावे व त्यानुसार माहिती द्यावी, अनाठायी पत्रव्यवहार करून दोघांचाही वेळ घालवू नये, असे आपण त्यांना कळविले. १५ दिवसांची अधिक मुदत देण्याची तयारीही दर्शविली, परंतु त्यांनी काहीही कळविले नाही. त्यामुळे आपण अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक), जिल्हा परिषद, सातारा यांच्याकडे अपील केले. त्यांनी अपिलाची दखल घेतली नाही. मात्र माहिती देण्यासाठी आणखी तीन महिन्यांची मुदत देण्याची विनंती करणारे पत्र जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी(प्राथमिक), जिल्हा परिषद, सातारा यांनी पाठविले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार ते योग्य नाही, असे त्यांना कळवून व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक), जिल्हा परिषद, सातारा यांनी अपिलाची दखल न घेतल्यामुळे आपण राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. माहिती नि:शुल्क मिळावी व जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती लावावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.मोहन बाबुराव लोखंडे यांनी केली.

श्री.लोखंडे यांनी मागितलेली माहिती १९ वर्षांच्या कालावधीतील, तसेच आपल्या कार्यालयातील विविध कार्यासनांकडील आणि जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या स्तरावरील आहे. अशी माहिती संकलित करणे अल्पावधीत शक्य नाही. आपल्या कार्यालयाकडील माहिती त्वरित दिली व सातारा जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांना तालुका स्तरावरील माहिती अपीलकर्त्यास देण्याबाबत कळविले. संकलित होईल त्या त्या स्वरूपात माहिती देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी(प्राथमिक), जिल्हा परिषद, सातारा श्री.आर.ए.चव्हाण यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

श्री.लोखंडे यांचा मूळ प्रश्न स्वत:च्या बदलीचा असून क्रमवारीने बदल्या केल्या जातात. श्री.लोखंडे यांच्या मागणीनुसार बदली न झाल्यामुळे अशा प्रकारचे अर्ज ते करीत आहेत. आजही बदल्यांच्या पस्तीस नस्त्या शिल्लक असून श्री.लोखंडे यांची नस्ती सातव्या क्रमांकावर आहे. त्यांनी आपल्याकडे अपील केलेले नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांच्याकडे त्यांनी अपील केले असून या विषयात ते अपिलीय प्राधिकारी नाहीत, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक), जिल्हा परिषद, सातारा श्री.एम.एम.पालकर यांनी केले.

आपल्या निर्णयानंतरचे अपील कोणाकडे करावे, याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी उत्तरासोबत देणे आवश्यक आहे, याची समज जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी(प्राथमिक), जिल्हा परिषद, सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक), जिल्हा परिषद, सातारा यांना देण्यात येत आहे. अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती विस्तृत व तालुका स्तरावरील आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी ती मिळवून देण्याबाबत योग्य कार्यवाही केली आहे. ऊर्वरीत माहिती अपीलकर्त्यास एक आठवड्यात द्यावी, ५० पानापर्यंत नि:शुल्क व त्यापुढील माहिती सशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याबाबत माहिती देणाऱ्या फलकाचे छायाचित्र, ५१७ पृष्ठांची माहिती दि.२१.११.२००९ रोजी पाठविल्याचा तपशील व आणखी माहिती हवी असल्यास अभिलेख अवलोकनासाठी दिलेली तारीख यासह

अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी(प्राथमिक), जिल्हा परिषद, सातारा श्री.आर.ए.चव्हाण व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक), जिल्हा परिषद, सातारा श्री.एम.एम.पालकर यांनी दि.२१.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२६.२.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. अलकेश मधुकर कांदळकर
मु.पो.जे.पी. नाईक कॉलनी, गारगोटी,
ता.मुदरगड, जि.कोल्हापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी तथा संचालक,** **उत्तरवादी**
मौनी विद्यापीठ,गारगोटी,
ता.मुदरगड, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०३४/२००९/कोल्हापूर<br>१०३७/२००९/कोल्हापूर<br>१०३८/२००९/कोल्हापूर |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>मौनी विद्यापीठाच्या बांधकामाच्या टेंडर नोटीसीबाबत, विद्यापीठास मिळणारे अनुदान व त्याचा विनियोग तसेच विद्यमान संचालक मंडळाच्या यादीस धर्मादाय आयुक्तांची मान्यता घेतली आहे काय? इत्यादी माहिती. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. अलकेश मधुकर कांदळकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ,जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ.कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे
दि. 18 FEB 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. संग्रामसिंह शंकर सावंत
मु.पो.सोनाळी (गारगोटी),
ता. भुदरगड,जि.कोल्हापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी तथा संचालक,** **उत्तरवादी**
मौनी विद्यापीठ गारगोटी,
ता. भुदरगड,जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०३५/२००९/ कोल्हापूर<br>१०३६/२००९/ कोल्हापूर |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माध्यमिक शाळेतील शिक्षक व त्यांच्या नेमणूक तारखा, निवृत्ती व रोस्टर यादी, तसेच विद्यापीठ सभासदांची यादी | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. संग्रामसिंह शंकर सावंत यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ.कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 18 FEB 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. सुधीर दादा पालकर
मु. रस्तापूर, पो.सुर्डी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

अपीलकर्ता

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहायक निबंधक,**
सहकारी संस्था,
बार्शी, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा सचिव ,**
रस्तापूर विविध कार्यकारी सेवा
सहकारी संस्था, रस्तापूर, पो.सुर्डी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०३६/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१/३/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७/६/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१/६/२००८ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** सुधीर पालकर यांचे ऊस बील, जाने. ०४ ते डिसें. ०७ चे कीर्द, मासिक सभा वृत्तांत, खर्चाचे व्यवहार इ. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १९/११/२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमात' या अपिलाचा समावेश होता.

'आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याचे' निवेदन दि. १७/७/२००९ रोजी अपीलकर्ता श्री. पालकर यांनी जन माहिती अधिकारी तथा सचिव, रस्तापूर विविध का.से.स. संस्था. रस्तापूर यांना दिले. त्या निवेदनाची प्रत जन माहिती अधिकारी तथा सचिव, रस्तापूर वि.का.से.स. संस्था, रस्तापूर यांनी आयोगास सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 26 FEB 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक महारूद्र रायचुरे
मु.पो.जवळा, ता.सांगोला, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत जवळा, ता.सांगोला, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०७०/ सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.५.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अशोक महारूद्र रायचुरे
मु.पो.जवळा, ता.सांगोला, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर श्री.व्ही.बी.कोळेकर

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
पंचायत समिती सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर श्री.एस.डी.कदम

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.६.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.३.२००७ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.७.५.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्या इमारतीपासून १०० फूट लांब इमारत असलेल्या अन्य व्यक्तीने केलेल्या अर्जावरून निम्मे बांधकाम झाल्यानंतर परवानगी रद्द केली. त्याबाबतची माहिती आपण मागितली होती. ती अपुरी व विलंबाने दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अशोक महारूद्र रायचुरे यांनी केली.

श्री.रायचुरे यांच्या शेजाऱ्याची तक्रार आल्यानंतर बांधकाम परवाना रद्द केला. त्यांनी माहिती मागितलेल्या सात मुद्दयांपैकी चार मुद्दयांमध्ये खुलासा अथवा स्पष्टीकरणाची मागणी केली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अशी विचारणा ही माहिती ठरत नसल्यामुळे त्याचे उत्तर दिले नाही. तसेच त्या काळात आपल्याकडे तीन ग्रामपंचायतींचा पदभार असल्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला. ती टपालाने निःशुल्क पाठविली, असे लेखी व तोंडी निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, जवळा, ता.सांगोला, जि.सोलापूर श्री.एस.डी.कदम यांनी पूरक कागदपत्रांसह केले. जन माहिती अधिकाऱ्यांचे प्रतिपादन वस्तुस्थितीनुसार असल्याचे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर श्री.व्ही.बी.कोळेकर यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, जवळा, ता.सांगोला, जि.सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर यांनी श्री.रायचुरे यांच्या अर्जावर केलेली कार्यवाही योग्य आहे. मुद्दा क्र.४ ची माहिती अपीलकर्त्यास तीन दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२६.२.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

प्रा.रमेश केशवराव वानखेडे
ए-१३/३०३, प्लॅनेट मिलेनियम,
पिंपळे सौदागर, पुणे-३७ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सचिव,
खडकी शिक्षण संस्था,
४९१, एलफिन्स्टन रोड, खडकी, पुणे- ३ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** प्राचार्य,
टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय,
४९१, एलफिन्स्टन रोड, खडकी, पुणे- ३

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०९ / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम तारीख | दि.१९.०३.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०७.०३.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.०८.२००६ |
| ५ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -</u>** दि.५.८.१९९६ ते दि.२४.१२.१९९६ व दि.८.८.१९९८ ते दि.८.८.२००५ या कालावधीतील सेवापुस्तकाची दुय्यम प्रत | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.रमेश केशवराव वानखेडे यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलाचा समावेश दि.१९.०३.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय,खडकी, पुणे प्रा.बी.पी.पुराणिक हे उपस्थित होते.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता अपीलकर्त्याने वर नमूद केल्याप्रमाणे सेवापुस्तकांची दुय्यम प्रत मागणी केलेली आहे, ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दिनांक : १८/०२/२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनासमोर, पुणे ४११ ००१

श्रीमती सुजाता सुरेश पाटील
मु.पो.दुधगाव, ता.मिरज,
जिल्हा सांगली ..... **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर ..... **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११०/२०१०/ सांगली + ११६/२०१०/सांगली |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | १०/७/२००९ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br><br>मौजे कुंभोज येथील फेरफार क्र. ३६७ व ४१९ च्या नोंदीबाबतची माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती सुजाता सुरेश पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकाच विषयासंदर्भात केलेल्या दोन्हीही अपिलांसोबत जोडपत्र अ , जोडपत्र ब, तसेच जनमाहिती

अधिकारी यांनी दिलेले उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

**आदेश**

दोन्ही अपिले दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**स्थळ : पुणे**
दि. 17 FEB 2010

अधिकारी यांनी दिलेले उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

## आदेश

दोन्ही अपिले दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहेत.

स्थळ : पुणे
दि. 17 FEB 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. संजय परशुराम पाटील
मार्केटिंग डिपार्टमेंट इंडियन एक्सप्रेस वृत्तपत्र समूह,
एक्सप्रेस टॉवर, नरिमन पॉईंट,
मुंबई-२१ **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक,**
जिल्हा रूग्णालय, कोल्हापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,**
शासकीय ग्रामीण रूग्णालय, कोवाड,
ता. चंदगड, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११३/२०१०/ कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०९.०६.२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०३.०७.२००९ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची(जोडपत्र-अ) ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. संजय परशुराम पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिसोबत जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व ॲपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ.कोणतीही

आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे

दि. 18 FEB 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुभाष दत्तात्रय अनगळ — अपीलकर्ता
१०८/८/२, अलंकार, सेनापती बापट रोड,
पुणे-४११ ०५३

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ढोले पाटील रोड, वाडिया कॉलेज चौक, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यवाह / अध्यक्ष, श्री चतु:शृंगी सेवा समिती, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११३५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.६.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री. सुभाष दत्तात्रय अनगळ, १०८/८/२, अलंकार, सेनापती बापट रोड, पुणे-४११ ०५३<br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यवाह, श्री चतु:शृंगी सेवा समिती, पुणे श्री. रमेश वैद्य | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.५.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

चतु:शृंगी सेवा समिती, पुणे या सार्वजनिक न्यासाचे आपणही विश्वस्त असून आपल्याला संस्थेकडून कोणतीही माहिती दिली जात नाही. विश्वस्त संस्थेच्या नियमानुसार कार्यवाही केली जात नाही. सेवा कराची प्रकरणे प्रलंबित आहेत. पूर्वीच्या बँकेतील खाती गोठविली असून दुसऱ्या बँकेत खाते उघडून व्यवहार चालविले जात आहेत, अशी तक्रार अपीलकर्ते श्री. सुभाष दत्तात्रय अनगळ व श्री. जयंत दत्तात्रय अनगळ यांनी केली.

सन २००३ ते २००४ या काळातील माहिती अपीलकर्ता श्री. सुभाष दत्तात्रय अनगळ यांनी मागितली आहे. ते त्यावेळी न्यासाचे अध्यक्ष होते. विद्यमान अध्यक्ष श्री. देवदत्त अनगळ यांनी मागणी करूनही श्री. सुभाष दत्तात्रय अनगळ यांनी तेव्हाची कागदपत्रे ताब्यात दिलेली नाहीत. तसेच नंतर झालेले कार्यवाह श्री. सुहास प्रभाकर अनगळ यांनी महत्त्वाची कागदपत्रे स्वत:च्या ताब्यात ठेवली असून त्यातील माहिती देणे शक्य नाही, असे विद्यमान अध्यक्ष श्री. देवदत्त अनगळ यांनी अपीलकर्त्यास लेखी कळविले आहे, असे अध्यक्ष श्री. देवदत्त अनगळ यांचे प्रतिनिधी श्री. देवेंद्र अनगळ व न्यासाचे कार्यवाह श्री. रमेश वैद्य यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. मात्र सर्व कागदपत्रे श्री. देवदत्त अनगळ यांच्याच ताब्यात असून खोटी कारणे देऊन ते माहिती देण्यास टाळत आहेत, असे प्रतिपादन श्री. सुभाष दत्तात्रय अनगळ यांनी केले.

संबंधित विश्वस्त संस्थेतील अंतर्गत वाद धर्मादाय आयुक्तांपुढे प्रलंबित असून त्या अनुषंगाने परस्परावर आरोप-प्रत्यारोप केले जात असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. तथापि संस्थेच्या सन २००३ ते २००६ या काळातील पदाधिकाऱ्यांची यादी आठ दिवसांत आयोगाकडे दाखल करावी व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार न्यासाचे कार्यवाह श्री. रमेश वैद्य यांनी दि. २५.६.२००९ च्या पत्रान्वये पदाधिकाऱ्यांचा तपशील आयोगाला सादर केला व त्याची प्रत रजिस्टर्ड टपालाने श्री. सुभाष दत्तात्रय अनगळ यांना पाठविली. मात्र सन २००४ ते २००८ या कालावधीतील यादी मिळाली नाही, तसेच श्री. सुहास प्रभाकर अनगळ यांना न्यासाच्या कचेरीत येण्यास प्रतिबंध केल्यामुळे त्यांना आवश्यक ती कागदपत्रे व माहिती देता येत नाही, असे दिसते, अशी तक्रार श्री. सुभाष दत्तात्रय अनगळ यांनी दि. २.७.२००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली.

तथापि मूळ अर्जात २००४ ते २००८ या काळातील माहितीची मागणी केलेली नाही व अन्य नावे देण्यात आली आहेत, तसेच संस्थांतर्गत वाद आहेत. सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, कलम २(एच) अन्वये 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास ) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रं. ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे कोणतेही पुरावे अपीलकर्ता श्री. सुभाष दत्तात्रय अनगळ यांनी सादर केलेले नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दाखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ०९ .२.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**